महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)अधिनियम १९६३ चे कलम ११ (४) अन्वये मानीव हस्तांतरण प्रमाणपत्र

मानीव हस्तांतरण अर्ज क्र.१/२०२२

प्रमाणपत्र

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११(४)अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी संगमेश्वर बदनाळे, सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा प्रमाणित करतो की, आनंद टॉवर फ्लॅट ओनर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या.बुलडाणा , र.नं.३८७ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे नोंदणी क्रमांक बियुडी/(बियुडी)/एचएसजी/(टिओ)/३८७/२०२०, दि. ९/३/२०२० अन्वये नोंदविण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नांवे नझुल शिट नं.६, प्लॉट नं.११/३, ले आऊट प्लॉट नं.६ या मधील एकूण ४९१.६४ चौ.मी.बांधकाम क्षेत्र असलेल्या इमारतीसह प्रवर्तकांचे हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांचे आनंद टॉवस फ्लॅट ओनर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्या. बुलडाणा, र.नं.३८७ यांचे नांवे "मानिव अभिहस्तांतरण " म्हणुन अभिहस्तांतरण विलेखाचे निष्पादन करण्यासाठी हे प्रकरण अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन योग्य असल्याचे प्रमाणित करुन खालील अटी व शर्तीवर सदरचे प्रमाणपत्र देत आहे.

१. सदरचे प्रमाणपत्र हे संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्राआधारे देण्यात येत आहे. याद्वारे हस्तांतरीत होणा-या जागेमध्ये व बांधकामामध्ये काही अनियमितता असल्यास ते याद्वारे नियमानुकुल केले आहे, असे समजण्यात येऊ नये.

२. या प्रमाणपत्राद्वारे हस्तांतरीत होणा-या जमीन व बांधकाम क्षेत्रापोटी आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क भरणे संबंधितांना बंधनकारक राहील.

मंजुर रेखांकनातील खुली जागा, सामाईक रस्ते, सोईसुविधा मधील इमारतीच्या बांधकामाच्या प्रमाणित अविभक्त हिश्यासह हस्तांतरीत करण्यात येत आहे (लागू असल्यास)

Sumitkumar S. Sardar
Proprietor
Anand Builders & Developars
Buldana.

(संगमेश्वर बदनाळे)
सक्षम अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,बुलडाणा.